राज्यात कोरोना विषाणूमुळे (Covid – 19 ) उद्भवलेल्या संसर्गजन्य आजारावर मात करण्यासाठी कंपनी, सेवाभावी संस्था/व्यक्ती व आस्थापनांकडून वस्तू स्वरुपात प्राप्त होणा-या मदतीच्या नियोजनाबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**(आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन)**
शासन निर्णय क्रमांक : आव्यप्र-२०२०/प्र.क्र. ९२/ आव्यप्र-१
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२
दिनांक – २४.०३.२०२०

**प्रस्तावना :**

राज्यात कोरोना विषाणुमुळे (Covid –19 ) उद्भवलेल्या संसर्गजन्य आजारांमुळे आपत्कालीन परिस्थिती निर्माण झालेली आहे. या साथीला अटकाव करणे व बाधीत झालेल्या रुग्णांवर वैद्यकिय उपचार करण्यासाठी सद्यथितीत व्हेंन्टीलेटर, सॅनीटायझर्स, पीपीई, आवश्यक औषधे यांचा तातडीने पुरवठा होणे आवश्यक आहे. अनेक कंपन्या, संस्था, व्यक्ती, आस्थापना यांनी या वस्तू दान स्वरुपात शासनाला देण्याची तयारी दर्शविलेली आहे. तसेच केंद्र शासनाने देखील कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय यांच्या दि.२३.०३.२०२० च्या परिपत्रकान्वये सीएसआर फंडाचा वापर Covid 19 या विषाणुमुळे होणारा संसर्ग टाळणे, साथ आटोक्यात आणणे, बाधीत झालेल्या रुग्णांवर उपचार करणे इ. संबंधीत बाबींसाठी वापर करण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे उपरोक्त आवश्यक वस्तू संबंधितांकडून प्राप्त झाल्यावर त्यांचा यथोचीत विनियोग होणेसाठी आवश्यक सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

कंपनी, संस्था, व्यक्ती वा आस्थापना यांच्याकडून Covid 19 चा संसर्ग टाळणे त्याला अटकाव करणे व त्यावरील उपचारासाठी आवश्यक वस्तू/बाबी या संबंधितांकडून

स्विकारण्यासाठी **कार्यकारी संचालक, हाफकीन इन्स्टिटयूट यांना प्राधिकृत करण्यात येत आहे**. त्यासाठी खालील प्रमाणे कार्यपध्दती राहील.

(१) वैद्यकीय उपचारांसाठी आवश्यक असणाऱ्या उपरोक्त वस्तूंची प्रत्येक जिल्हानिहाय आवश्यकता सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये यांच्यामार्फत वेळोवेळी निश्चित करण्यात येईल.

(२) दाता संस्थांकडून आणि व्यक्तींकडून प्राप्त होणाऱ्या उपरोक्त नमूद वस्तू या कार्यकारी संचालक, हाफकीन इन्स्टिटयूट यांच्याकडून स्विकारल्या जातील आणि ते त्यांचे वाटप सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये यांनी वेळोवेळी निश्चित केलेल्या यादीनुसार व जिल्हाधिकारी यांच्या आवश्यकतेनुसार संबंधित जिल्ह्यास करतील.

(३) कार्यकारी संचालक, हाफकीन यांनी त्यांना विविध संस्थांकडून प्राप्त झालेल्या वस्तू / बाबींचा तपशिल प्रपत्र "अ" मध्ये मध्ये ठेवावा. तसेच त्यांनी जिल्हाधिकारी यांना वितरीत केलेल्या वस्तू आणि जिल्हाधिकारी यांनी संबंधित रुग्णालये व संस्था यांना वितरीत केलेल्या बाबींचा ताळमेळ नियमितरित्या घ्यावा व सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये यांना सादर करावा.

(४) कार्यकारी संचालक, हाफकीन यांनी संबंधित संस्थांना त्यांचेकडून प्राप्त झालेल्या वस्तूंबाबत "प्रपत्र - ब" प्रमाणे प्रमाणपत्र द्यावे.

सचिव, आपत्ती व्यवस्थापन, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांनी या सर्व प्राप्त वस्तूंचा विनियोग यथोचितरित्या होत आहे यासाठी पर्यवेक्षण करावे.

किशोरराजे निंबाळकर

( किशोर राजे निंबाळकर )
सचिव (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन)

## प्रपत्र — "अ"

## कंपनी / व्यक्ती/ संस्था वा आस्थापनाकडून प्राप्त बाबींचा बाबनिहाय तपशिल

| अ.क्र. | बाब | नग | किंमत (दाता व्यक्ती/ संस्थांनी प्रमाणित केल्याप्रमाणे) |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

## प्रपत्र — "ब"

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, करोना विषाणू (Covid — 19 ) मुळे होणा-या संसर्गजन्य आजारास अटकाव करणे व या रोगाच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी----------- यांच्याकडून ------------ (बाब) -----------(नग) ---------(एकूण किंमत रुपये — दाता व्यक्ती/ संस्थानी प्रमाणित केल्याप्रमाणे ) प्राप्त झाले.

दिनांक -

ठिकाण -

कार्यकारी संचालक,

हाफकीन

**प्रत –**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३) मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
४) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
७) मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
८) सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई.
९) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य, मंत्रालय, मुंबई.
१०) सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये, मंत्रालय, मुंबई.
११) आयुक्त, सार्वजनिक आरोग्य तथा आयुक्त, राष्ट्रीय आरोग्य मिशन.
१२) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१३) कार्यकारी संचालक, हाफकीन इन्स्टिटयूट, परेल, मुंबई.
१४) सर्व विभागीय आयुक्त
१५) सर्व जिल्हाधिकारी.
१६) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.